# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७/ अग्रहायण २,१९३९ शके

**१८२. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-**

(**१**)महाराष्ट्र विधानसभेच्या **सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७** रोजीपासून विधानभवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या **सन २०१७ च्या चतुर्थ (हिवाळी)** अधिवेशनासाठी स्वीकारण्यात येणाऱ्या लक्षवेधी सूचना मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या निदेशानुसार MOIS या संगणक प्रणालीवर **संपूर्णतः ऑनलाईन (online) पध्दतीने सोमवार, दिनांक ०४ डिसेंबर, २०१७** पासून **सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

(**२**)लक्षवेधी सूचना **ऑनलाईन (online)** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने प्रथम दिवशी अवलंबविण्यात येत असलेली बॅलट पध्दत **कायमस्वरूपी** बंद करण्यात येत आहे.

(**३**)महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप जास्तीत जास्त १५० ते १७५ शब्दांचे असावे.

(**४**)अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण **३ दिवस** अगोदरचा दिवस हा **ONLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना** स्वीकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(**५**)लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेणेसंबंधीचा संपूर्ण अधिकार हा **मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचाच राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१७.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

<u>याची प्रत:-</u>

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
(३) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) संगणक कक्ष (WEBSITE)
(९) एम.के.सी.एल कक्ष (MKCL)